
**सुविचार**
आप अनुमान लगाने का जितना अधिक प्रयत्न करेंगे, उतना ही अधिक परेशान होंगे ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२०१ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून निर्णय घेतले जातील



नवी दिल्ली : शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढवून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबध्द आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

कृषी उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढविण्याच्या उद्देशाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयांवर प्रकाश टाकताना पंतप्रधान म्हणाले की, कांद्यावरील निर्यात शुल्क कमी करणे असो किंवा खाद्यतेलांवरील आयात शुल्क वाढवणे असो, अशा निर्णयांमुळे आपल्या अन्नदात्यांना मोठा फायदा होणार आहे. या निर्णयांमुळे त्यांचे उत्पन्न वाढणार आहे, त्याचबरोबर ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीही वाढणार आहेत.

पंतप्रधानांनी एक्स पोस्टवर काय लिहिले?

मदेशाच्या खाद्य सुरक्षेसाठी रात्रंदिवस परिश्रम करणा-या आपल्या शेतकरी बंधू-भगिनींचे हित साधण्यासाठी आमचे सरकार कोणतीही कसर ठेवत नाही. मग यामध्ये कांदा निर्यातीवरील शुल्क कमी करणे असो अथवा खाद्य तेलांवरील आयात शुल्क वाढविणे असो; आम्ही घेतलेल्या अशा अनेक निर्णयांचा खूप मोठा लाभ आपल्या (पान ३ वर)

## सत्ताधाऱ्यांना सत्तेचा उन्माद, निवडणुकीत जागा दाखवू

धुळे : प्रतिनिधी- सत्तेचा माज या लोकांच्या डोक्यात शिरला आहे. त्यांच्याकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिकार आपणास दिला आहे. परंतु या लोकांना सत्तेचा उन्माद चढला आहे. त्यांना आता खड्यासारखे बाजूला काढा. या निवडणुकीत ती संधी तुम्हाला आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार धुळ्यातील सिंदखेडा येथील शेतकरी मेळाव्यात बोलत होते.




या मेळाव्यातून त्यांनी नरेंद्र मोदी सरकारच्या शेती धोरणावर जोरदार हल्ला केला. आपण दहा वर्षे कृषि विभागाचे काम करत होतो, तेव्हा देश अन्नधान्यासंदर्भात स्वयंपूर्ण झाल्याचे शरद पवार यांनी सांगितले.

पुढे बोलताना, सत्तेचा माज या लोकांच्या डोक्यात शिरला आहे. त्यांच्याकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिकार आपणास दिला आहे. परंतु या लोकांना सत्तेचा उन्माद चढला आहे. त्यांना आता खड्यासारखे बाजूला काढा. या निवडणुकीत ती संधी तुम्हाला आहे.

पुढे बोलतान पवार म्हणाले की, आजच्या राज्यकर्त्यांना शेतीची आस्था नाही. त्यांच्याकडून शेतीसंदर्भात धोरणे राबवली जात नाहीत. कांद्यासंदर्भातील उदाहरण समोर आहे. मोदी सरकारने त्या कांद्याच्या निर्यातीवर बंदी आणली होती. कांद्याला भाव मिळाला नव्हता. कांदा उत्पादक शेतक-यांनी कष्टाने कांद्याचे पीक घेतले. त्यानंतर निर्यात बंदी करण्यात आली. गहू, तांदळावर बंदी घातली.

जे, जे तुम्ही पिकवता त्यावर निर्यात बंदी केली. मोदी सरकार शेतक-यांच्या विरोधात आहे. दहा वर्षे मी शेतीचे जे काम केले त्यामुळे जगात सर्वाधिक तांदूळ पिकवणारा देशात भारत पहिल्या क्रमांकावर पोहोचला.

बहिणींचा सन्मान राखला जावा

शरद पवार म्हणाले, आता गुंडगिरीचे राज्य सुरु झाले आहे. हे सरकार बहिणींना १५०० हजार रुपये देणार आहे. पण बहिणींची (पान ३ वर)

## अरविंद केजरीवाल देणार मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

नवी दिल्ली : - दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दोन दिवसांनंतर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असल्याची मोठी घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे दिल्लीसह देशातील वातावरण ढवळून निघाले आहे.

मी येत्या दोन दिवसांनंतर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार असून जोपर्यंत जनता आपला निकाल देत नाही, तोपर्यंत मी मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसणार नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

नुकतेच मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सहा महिन्यांनंतर तुरुंगातून बाहेर आले आहेत. कथित मद्य धोरण घोटाळाप्रकरणी सुप्रीम कोर्टाने त्यांना नियमित जामीन मंजूर केला आहे. मात्र, जामीन मंजूर करताना कोर्टाने त्यांच्यावर अनेक बंधने देखील घातली आहेत.

अशातच आता त्यांनी राजीनामा देणार असल्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेमुळे देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. शिवाय केजरीवाल यांच्या राजीनाम्यानंतर दिल्लीचा नवीन मुख्यमंत्री कोण असणार याबाबतच्या चर्चांना उधाण आले आहे.

मी आता जनतेच्या न्यायालयात : केजरीवाल

केजरीवाल म्हणाले, मी आता (पान ३ वर)

## विरोधकांकडून मला पंतप्रधानपदाची ऑफर

नागपूर : प्रतिनिधी- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे विरोधी पक्षांच्या नेत्यांनाही आपलेसे वाटतात. विरोधी पक्षांच्या नेत्यांकडूनही गडकरी यांच्यावर स्तुतिसुमने उधळली जातात. विरोधी असो वा आपल्या पक्षाचा ते कधीही निधी देण्यात भेदभाव करत नाहीत, असेही बोलले जाते. मात्र, आता विरोधी पक्षाकडून मला पंतप्रधानपदाची ऑफर दिल्याचा गौप्यस्फोट नितीन गडकरी यांनी केला आहे.

विरोधी पक्षातील एका बड्या नेत्याने संपर्क साधून, तुम्ही पंतप्रधान व्हा, आम्ही पाठिंबा देतो, अशी ऑफर दिली होती. पण, मला या पदाची लालसा नाही, असे सांगून ऑफर धुडकावल्याचे नितीन गडकरी



यांनी म्हटले आहे. आता मात्र, तो बडा नेता कोण? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. नागपूर पत्रकार संघाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात गडकरी बोलत होते.

नितीन गडकरी म्हणाले, मी कुणाचेही नाव घेणार नाही. मात्र, विरोधी पक्षातील एका बड्या नेत्याने मला ऑफर दिली होती की, जर तुम्ही पंतप्रधान होणार असाल, तर आम्ही पाठिंबा द्यायला तयार आहोत. पण, मी त्यांना सांगितले, तुम्ही मला पाठिंबा का द्याल? आणि मी तुमचा पाठिंबा का घेऊ?

पंतप्रधान होणे हे माझ्या जीवनाचे लक्ष्य कधीच नाही. मी माझ्या पक्षाशी एकनिष्ठ आहे. पदासाठी मी पक्षाशी तडजोड कदापि करणार नाही. माझ्या दृढनिश्चयच माझ्यासाठी महत्त्वपूर्ण आहे, असे गडकरी यांनी सांगितले.

मी कुणाचेही नाव घेणार नाही

(पान ३ वर)

## ६ तासांच्या विलंबानंतर मुंबई-दोहा इंडिगो विमान रद्द

मुंबई : मुंबईतील इंडिगो एअरलाईन्सबाबत सातत्याने नवनवीन अपडेट्स समोर येत असतात. अशातच आज इंडिगो विमानतळावर हवाई प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती मिळत आहे. मुंबइहून दोहा-कतारला जाणारे इंडिगोचे विमान तब्बल ६ तासानंतर रद्द करण्यात आले. त्यामुळे या विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी इंडिगोबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ३ वाजून ५५ मिनिटांच्या सुमारास उड्डाण करणार होते. मात्र विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान ६ तासांनंतर रद्द करण्यात आले.

या विमानात २०० ते ३०० प्रवासी होते. प्रवाशांना विमानात चढवल्यानंतर विमान तासनतास विमानतळावरच उभे होते. सुमारे ५ तास प्रवाशांनी विमान उड्डाण होण्याची वाट पाहिली तसेच त्यांना विमानातून उतरण्याची परवानगी देखील दिली नव्हती. परंतु प्रवाशांचा संताप वाढल्यावर क्रू मेंबर्सनी त्यांना फ्लाइटमधून उतरण्याची परवानगी दिली आणि इमिग्रेशन वेटिंग एरियामध्ये नेले. तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द करण्यात आल्याचे इंडिगोने म्हटले.

प्रवाशांचा संताप

प्रवाशाने असा दावा केला की, या काळात त्याला पाणी आणि अन्नही मिळाले नाही.

इंडिगोने काय म्हटले?

इंडिगो एअरलाइन्सने या प्रकाराबाबत एक निवेदन जारी केले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, आम्ही विमान एकदा किंवा दोनदा उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. त्यामुळे आम्ही फ्लाइट रद्द केली आहे. पुढील फ्लाइटसाठी रिबुकिंग केले जात आहे. तसेच विमानतळावरील आमच्या टीमने त्यांना (पान ३ वर)

## अकरावी प्रवेशासाठी कुणी विद्यार्थी देता का विद्यार्थी परिस्थिती निर्माण

पुणे : अकरावी प्रवेशासाठी तीन नियमित आणि पाच विशेष फेऱ्या राबवूनही प्रवेशाच्या तब्बल २ लाख २० हजार ६९२ जागा रिक्तच राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्यात अकरावी प्रवेशाच्या तीन नियमित आणि पाच विशेष अशा एकूण आठ फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. दहावीच्या परीक्षेत ९५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होऊनही अकरावी प्रवेशासाठी कुणी विद्यार्थी देता का विद्यार्थी? अशी परिस्थिती यंदा निर्माण झाली आहे.

या फेऱ्या संपल्यानंतर उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे विभागात प्रवेशासाठी १ हजार ७२७ महाविद्यालये उपलब्ध आहेत. या महाविद्यालयांमध्ये ६ लाख २७ हजार ६७० जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ४ लाख ९३ हजार ९०४ विद्यार्थ्यांनीच नोंदणी केलेली आहे. उपलब्ध जागांच्या १ लाख ३३ हजार ७६६ विद्यार्थ्यांनी नोंदणी देखील केली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तर, नोंदणी झाल्यानंतर आणि प्रवेशाच्या आठ फेऱ्या झाल्यानंतर प्रवेशाच्या २ लाख २० हजार ६९२ जागा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे अकरावी प्रवेशाकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्याचे स्पष्ट झाले आहे.

शैक्षणिक संस्थांवर विद्यार्थी शोधण्याची वेळ विद्यार्थ्यांचा पारंपरिक शिक्षणाऐवजी कौशल्य शिक्षणाकडे जास्त कल वाढत आहे. यातूनच पॉलिटेक्निक, आयटीआय किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांकडून विशेष पंसती दिली जात आहे. तर, शैक्षणिक संस्थांचे न झेपणारे शैक्षणिक शुल्क, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शहरात शिक्षणास येण्यास नकार, यासह अन्य कारणांमुळे विद्यार्थी अकरावी प्रवेशाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.

विभागनिहाय अकरावी प्रवेशाच्या रिक्त जागा

मुंबई विभाग रिक्त जागा १ लाख ३७ हजार ५०४ पुणे विभाग रिक्त जागा ४३ हजार १९६ नागपूर विभाग रिक्त जागा नाशिक विभाग रिक्त जागा २२ हजार ८७० १० हजार ८०३ अमरावती (पान ३ वर)

## खाद्यतेलाच्या आयात शुल्कात वाढ, तेल महागणार

### सणासुदीत बजेट कोलमडणार

नवी दिल्ली : - सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. नुकताच महालक्ष्मीचा सण झाला. आता पितृ पंधरवडा, नवरात्रोत्सव आणि दिवाळीचा सण येणार आहे. त्यामुळे सध्याचा काळ सणासुदीचा आहे. ऐन सणासुदीत खाद्य तेलाचे दर वाढणार आहेत. केंद्राने क्रूड, रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि अन्य खाद्य तेलांवरील कस्टम ड्युटी वाढविण्याचा निर्णय घेतला. तसेच आयात शुल्कात २० टक्के वाढ केल्याने खाद्य तेलाचे दर पुन्हा गगनाला भिडणार आहेत. त्यामुळे आता सर्वसामान्यांचे बजेट कोलडणार आहे. आधीच महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यात आता खाद्य तेलाचे दर वाढणार असल्याने सामान्यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे शुल्क वाढल्याने आता सोयाबीनला चांगला भाव मिळेल, असा विश्वास सत्ताधारी भाजपने व्यक्त केला आहे.

नवरात्रात ९ दिवसांचे उपवास असतात. या काळात दीपोत्सवही होत असतो. त्यातच दिवाळीत फराळ तयार केला जातो. यासाठी खाद्य तेल वापरले जाते. ऐन सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या किमती वाढल्याने ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे तर गृहिणींचे महिन्याचे बजेट कोलमडत चालले आहे. केंद्र सरकारने क्रूड, रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि अन्य खाद्य तेलांवरील कस्टम ड्युटी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. आयात शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आल्याने खाद्य तेल महागणार आहे. ऐन सणासुदीत ही दरवाढ झाल्याने याच्या झळा सर्वसामान्यांना बसणार आहेत.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाकडून यासंबंधी अधिसूचना काढली असून, त्यानुसार, क्रूड आणि रिफाइंड पाम तेल, सोयाबीन तेल आणि सनफ्लॉवर सीड तेल यांवर बेसिक कस्टम ड्युटी वाढविली आहे. क्रूड पाम ऑइल, क्रूड सोयाबीन तेल आणि क्रूड सनफ्लॉवर सीड ऑइलवर बेसिक कस्टम ड्युटीचे दर शून्य होते. आता हे (पान ३ वर)

## रशियाला बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे विकल्याचा पाश्चात्त्य देशांचा आरोप

तेहरान : पाश्चात्त्य देशांनी इराणने रशियाला बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे विकल्याचा आरोप करून इराणवर नवीन निर्बंध लादले आहेत. यावर इराणचे परराष्ट्रमंत्री सय्यद अब्बास अर्घाची यांनी तेहरानवर काही पाश्चात्त्य देशांनी लादलेल्या नवीन निर्बंधांवर जोरदार टीका केली. अर्घाची म्हणाले की, पाश्चात्त्य देशांना हे माहीत असले पाहिजे की, इराणवर निर्बंधनाचा काहीच उपयोग होणार नाही. हे त्यांना अजूनपर्यंत माहीत नाही, हे आश्चर्यकारक आहे. अमेरिका, फान्स, ब्रिटन आणि जर्मनी आण्विक मुद्यावर त्यांचे हेतू आमच्यावर लादू शकत नाहीत आणि आम्ही रशियाला बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे विकल्याचे आरोप निराधार आहेत, असेही परराष्ट्रमंत्री अर्घाची म्हणाले.

एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत परराष्ट्रमंत्री पुढे म्हणाले की, इराण पूर्ण ताकदीने आपल्या मार्गावर पुढे जात राहील. मात्र, आपला देश संवादाचे दरवाजे नेहमीच खुले ठेवेल. संवादाचा मार्ग कधीही सोडला नाही, परंतु अशी मुत्सद्दी प्रक्रिया परस्पर आदरावर आधारित असली पाहिजे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते नासेर कनानी यांनी शनिवारी सांगितले की, इराणने रशियाला बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे विकल्याबद्दलचे कोणतेही दावे निराधार आहेत.

बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे विकल्याचे दावे निराधार

युक्रेनविरुद्ध वापरण्यासाठी इराणने रशियाला कमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांचा पुरवठा केल्याच्या (पान ३ वर)

## आ. अमित देशमुख यांनि घेतले लातूर उद्योग समूहाच्या उद्योग मित्र गणेश मंडळाच्या श्रीचे दर्शन



लातूर प्रतिनिधी : - राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज शनिवार दि. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी एमआयडीसी भागातील लातूर उद्योग समूहाच्या उद्योग मित्र गणेश मंडळास भेट देऊन मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित सर्व लातुर उद्योग समूहाचे पदाधिकारी सदस्यांना श्री गणेश उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

राज्यासह देशभरात उद्योजकांना आल्यावर थांबण्यास जशा वास्तू विश्रामगृह आहेत तसे लातूर मध्ये असावे ही कल्पना लातूर उद्योग समूह परिवाराकडून समोर आली आणि आज या ठिकाणी उद्योग मित्रची देखणी इमारत उभी आहे ज्यात उद्योजक बंधूसाठी विश्रामगृह, कॉन्फरन्स हॉल कार्यालय आहे. लातूरचे उद्योजक हे त्यांचे ठराविक उद्योग करतात त्यांना यात कसलीही अडचण येऊ नये, प्रत्येक उद्योजकाला त्याचा उद्योग करताना स्वातंत्र्य आहे ज्यामुळे लातूरच्या विकासात भर पडत आहे.या पुढे देखील लातूर मधील उद्योजकांना त्यांच्या उद्योगात पाठबळ दिले जाईल. लातुरात माहिती अधिकारात अनेकांचे अनेक उद्योग सुरू असतात यामुळे लातूरच्या विकासात खीळ बसत आहे जे व्हायला नको अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी पूढे बोलतांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, लातूर उद्योग समूहाच्या या उद्योग मित्र परिवार इमारतीत रेलचेल वाढली पाहिजे, तरुणांना उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी नवनविन प्रशिक्षण शिबिरे या ठिकाणी भरवली जावीत यातून बेरोजगारीचा प्रश्न काही अंशी कमी होण्यास मदत होईल,लातूर मधील गुंतवणूक वाढेल यासाठी आपन सर्वांनी एकत्रित येऊन वेगवेगळ्या उद्योग उभारणी साठी प्रयत्न करावे लागतील यासाठी (पान ३ वर)

## मांजरा साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

लातूर / प्रतिनिधी- केंद्र शासनाच्या एफआरपी कायद्यानूसार मांजरा कारखान्याच्या प्रमाणीत साखर उता-यास २५०५ रुपये भाव असताना विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या इतर उपपदार्थांच्या विक्रीतून झालेल्या नफ्यातून ऊस उत्पादक शेतक-यांना पाडव्यापुर्वी प्रति मेट्रिक टन २६०० रुपये प्रमाणे ऊस बिलापोटी यापूर्वी दिले असून आणखी १०० रुपये देण्याचे कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी जाहीर केले.त्यामुळें मांजरा साखर कारखान्याचा उसाचा अंतीम दर २७०५ रुपये मिळणार आहे तर कर्मचाऱ्यांना १६.६६ टक्के बोनस (दोन महिन्यांचा पगार जाहीर) करण्यात आला आहे त्यांच्या या घोषणेचे ऊस उत्पादक शेतक-यांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात स्वागत केले. लातूर तालुक्यातील विलासनगर येथील विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना अधिमंडळाची ४० वी सर्वसाधारण सभा दि.१४ सप्टेंबर रोजी लातूर शहरातील



कातपूर रोडवरील पार्वती मंगल कार्यालयात कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.त्यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी घोषणा केली..

या सभेस प्रमुख पाहूणे म्हणून राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार धिरज विलासराव देशमुख, साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, अँड श्रीपतराव काकडे,रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रविंद्र काळे, ट्वेंन्टीवन शुगर उपाध्यक्ष विजय देशमुख, बाजार समितीचे माजी सभापती ललितभाई शहा, यशवंतराव पाटील, गणपतराव बाजूळगे अनंतराव देशमुख समद पटेल यांची प्रमुख उपस्थिती होती..

अधिक भाव देण्याची परंपरा मांजराने कायम ठेवली

शेतकरी म्हणून शेतकजयांच्या अपेक्षा असणे सहाजिक आहे. त्या अपेक्षा पुर्ण करणे हे मांजरा परिवाराचे कर्तव्य आहे, असे नमुद करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख पुढे म्हणाले, विकासरत्न विलासराव देशमुख, यांनी त्या काळात मांजरा साखर कारखान्याच्या (पान ३ वर)

# दीड पाणी ,सात पाणी, रजिष्ट्र्या तात्काळ सुरू करा मुख्यमंत्र्यांकडे मागणी

लातूर प्रतिनिधी : दीड पाणी सात पाणी व एक ते दहा गुंठे जमीन खरेदी विक्री व्यवहार ठप्प झाले आहेत ते सुरळीत सुरू करावेत या साठीच हायकोर्ट निकालाची व शासन निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकाऱ्यानी करावी या मागणीसाठी काल दिनांक १४ सप्टेंबर रोजी समस्त लातूरकर संघर्ष समितीकडून लातूर विमानतळ येथे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले. मुद्रांक व नोंदणी महानिरीक्षक पूणे यांनी १२ जुलै २०२१ रोजी १ बेकायदेशीररीत्या परिपत्रक काढले होते. यामध्ये दीड पानी, सात पानी मालमत्ता असेल किंवा १ गुंठा, ५ गुंठे, १० गुंठे यांचे खरेदीखत म्हणजे रजिस्ट्री करण्यासाठी गुंठेवारी व मंजूर रेखांकन केल्याशिवाय कुठलीही रजिस्ट्री करु नये असा आदेश महाराष्ट्रातील सर्व सहदुय्यम निबंधक यांना देण्यात आला होता.

या जाचक किंबहुना बेकायदेशीर परिपत्रकामुळे लातूर जिल्ह्यातील जवळपास २७ लाख मालमत्तेचे व्यवहार ठप्प झाले होते. कुणाचे लग्न असो, कुणाचा दवाखान्याची अडचण असेल, कुणाची शिक्षणाची अडचण असेल अश्या प्रसंगी मालमत्ताधारकांना प्रॉपर्टी खरेदी विक्री करता येत नव्हती या सदरील परिपत्रकाला सर्व प्रथम लातूर मधून दि.१२ जुलै २०२१ रोजीच तीव्र विरोध करण्यात आला होता.

यामध्ये सर्वपक्षीय सर्व संघटना व मालमत्ताधारक समस्त लातूरकर संघर्ष समिती च्या माध्यमातून एकत्र आले होते. यामध्ये धरणे आंदोलन, अधिकाऱ्यांना घेराव आंदोलन, १० दिवस काम बंद आंदोलन, धिक्कार मोर्चा अश्या प्रकारचे आंदोलने लातूरमध्ये करण्यात आले होते. लातूर ही चळवळीची भूमी आहे. आणि या चळवळीसोबत राज्यातील १४ जिल्हे लातूरच्या प्रत्येक आंदोलना प्रमाणेच अनुकरण करत होते. आंदोलने करुनही न्याय मिळत नाही म्हणून संभाजी नगर हायकोर्टमध्ये या परिपत्रका विरोधात दि.०५ मे २०२२ रोजी अपील करण्यात आले. त्यानंतर दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी मुद्रांक व नोंदणी विभागाने बेकायदेशीररीत्या काढण्यात आलेले परिपत्रक हे हायकोर्ट न्यायमुर्ती श्री. आर. व्ही. घुगे व न्यायमुर्ती श्री.एस.जी. मेहरे यांनी दि. १३ एप्रिल २०२३ रोजी रद्द केले या निर्णयामध्ये हायकोर्टाने म्हंटले आहे की, १२ जुलैचे परिपत्रकातील तरतुदीनुसार कोणताही दस्त सहदुय्यम निबंधक यांना नाकारता येणार नाही. याउपरही महाराष्ट्र सरकारला सुप्रीम कोर्टात जायची इच्छा असल्यामुळे सुप्रीम कोर्टात जाऊन ४ आठवड्यात या निर्णयाविरोधात स्थगिती घ्यावी अन्यथा हायकोर्टाचा आदेश अंमलात आणावा एवढे स्पष्ट हायकोर्टाकडून निकालात नमूद केले असतानाही या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. यामुळे महाराष्ट्रातील सर्व सहदुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाज ठप्प आहेत. त्यासोबतच शासन निर्णय दि. १३ मार्च २०२४ यामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना विभाग अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार सर्व महसुली प्राधिकारी व अधिकारी यांना खालीलप्रमाणे दिशानिर्देश दिले आहेत. १. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार विकास आराखडा/प्रादेशिक विकास योजना यामधील तरतुदीनुसार बिनशेती वापर अनुज्ञेय असल्यास स्वतंत्र बिनशेती परवानगीची आवश्यकता नाही. २. संबंधित विकास आराखड्यातून शेतजमीनीस बांधकाम परवानगी/रेखांकन मंजूरी दिली असल्यास सदर शेतजमीन मंजूर प्रयोजनासाठी बिनशेतीकडे वर्ग झाल्याचे मानण्यात येईल. ३.सदर जमिनीतील विकास परवानगी/बांधकाम परवानगी मंजूर बांधकाम आराखडे यांच्या आधारे अकृषिक वापराबाबतची सनद संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी निर्गमित करावी. ४. नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी/बांधकाम परवानगी देण्या पुर्वी बिनशेती परवानगीचा आग्रह धरु नये. असे असतानाही हायकोर्ट निर्णयाचा व शासन निर्णयाचा अवमान महाराष्ट्रातील सर्व सहदुय्यम निबंधकाकडून केला जात आहे. यामुळे सर्वसामान्य लोकांचे हालबेहाल होत आहेत. गुंठेवारी व मंजूर रेखांकन करण्यासाठी वर्ष वर्ष लागत आहे. त्यामुळे कोर्टाच्या निर्णयाची व शासनाच्या निर्णयाची कठोर आणि तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. या मागणी साठी समस्त लातूरकर संघर्ष समितीच्या वतीने आंज लातूर येथील विमानतळ येथे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले असता निवेदन देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना (शिंदे गट) लातुर संपर्कप्रमुख ॲड. बळवंतराव जाधव, समस्त लातूरकर संघर्ष समितीचे समन्वयक रामेश्वरजी धुमाळ, हणुमंत फेरे, दयानंद एरंडे, प्रदीप सुर्यवंशी, प्रा. दत्ता पाटील, राजकुमार शिंगण, विलास कोलफुके, कलीम पठाण, बाबासाहेब गायकवाड, विनय जाकते,नवनाथ नरवडे, ज्ञानेश्वर लखादिवे, रामप्रसाद धामट, जालिंदर बरडे, बालासाहेब कोकाटे, रय्याण पठाण, राम पांचाळ, परमेश्वर लखादिवे, शहाजी बनकर, शिवलींग बोरे, महेश चव्हाण, उमेश ढगे, संतोष लोकरे, नाना लोंढे, हरीभाऊ सुर्यवंशी,ताजोद्दीन बाबा, दणके साहेब, अकबर सय्यद, महेबुब सय्यद, अय्याज पटेल, नासीर खान, उमेश ठाकूर, हंसराज जोगदंड, अशोक सुर्यवंशी, आदींची उपस्थिती होती.



# हा रेल्वे बोगी नव्हे बोगस कारखाना

## आमदार देशमुख यांची टीका, लातूर ग्रामीणमधील औसा तालुक्यातील गावांत संवाद



पश्चिमवाहिनी नद्यांचे वाहून जाणाऱ्या पाण्यासाठी वळण योजना आणल्या तरच मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र वाढेल व त्यासोबत उदयोग व रोजगार येतील. बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्गासाठी सरकारकडे पैसा आहे. मात्र, शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाच्या सुविधा देण्यासाठी पैसा नाही. लातूर जिल्हा बँकेने हार्वेस्टरच्या माध्यमातून उद्योजक निर्माण केले आहेत. त्या धर्तीवर सोयाबीन काढणी यंत्राच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीसाठी कर्ज देण्याचा बँकेचा विचार आहे. महिला बचत गटांसाठी जिल्हा बँक पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज देते. बँकेच्या या योजनांचा लाभ घ्यावा.

– आमदार धिरज विलासराव देशमुख.

लातूर/प्रतिनिधी– स्थानिक बेरोजगारांना मोठ्या संख्येने रोजगार देण्याचे गाजर दाखवून रेल्वे बोगी कारखाना उभारण्यात आला. त्याचे एकदा नव्हे चारवेळा उदघाटन करण्यात आले. मात्र, कारखान्यातून ना बोगी बाहेर पडली किंवा रोजगाराची उपलब्धता झाली. त्यामुळे हा बोगी कारखाना आहे, की बोगस कारखाना आहे, हे कळत नाही. याबद्दल लोकांनीच आता सत्ताधाऱ्यांना जाब विचारावा लागेल, अशी टीका लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील समदर्गा व कोरंगळा (ता. औसा) येथे आमदार देशमुख यांनी शुक्रवारी (दि. १४) ग्रामस्थांशी संवाद साधला. या वेळी ते बोलत होते. खोटे आश्वासन देऊन सत्तेवर आलेल्या महायुती सरकारच्या धोरणाला शेतकरी, महिला व तरुण वैतागले आहेत. भाव वाढणार म्हणून सोयाबीनची थप्पी घरी किती दिवस ठेवायची. जाहिरातबाजीच्या माध्यमातून केवळ विकासाचे चित्र रंगवायचे सरकारचे धोरण आहे. जनतेच्या पैशातून जाहिरातीसाठी पगारी योजना दूत नेमले जात आहेत. राज्यात व केंद्रात भाजपचे सरकार असताना शेतीमालाला भाव नाहीत, रोजगार नाही, नोकरभरती नाही, महागाई वाढली आहे, जीएसटीतून पिळवणूक केली जाते, महिला सुरक्षित नाहीत. याबद्दल येणाऱ्या निवडणूकीत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारला पाहिजे. पंधराशे व दोन हजारांचे आमिष दाखवून बोळवण केली जात आहे. तात्पुरता विचार न करता भविष्याचा विचार करून आपल्या हक्कासाठी व शाश्वत रोजगारासाठी सजग राहून हित जोपसणारे सरकार निवडले पाहिजे, असे आमदार देशमुख म्हणाले.

कोरंगळा येथील जिल्हा परिषद शाळांतील नवीन सात वर्गखोल्या बांधकामासाठी पाठपुरावा केला. यामुळे ६१.५० लाखाचा निधी मंजूर झाला. विविध योजनांच्या माध्यमातून गावाच्या विकासकामात योगदान देता आले, याचे समाधान आहे. ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार संविधान सभागृह, समाज मंदीर संरक्षक भिंत, रस्त्यांची दुरुस्ती आदी कामे तातडीने पूर्ण करू, अशी ग्वाही आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी दिली. समदर्गा येथे महिलांसाठी सभागृह, हनुमान मंदीर येथील सभामंडपाच्या दुरुस्तीचे काम करू, असेही यावेळी त्यांनी आश्वस्त केले. या वेळी सचिन दाताळ, अनुप शेळके, सदाशिव कदम, महेंद भादेकर, चौधरी, रघुनाथ शिंदे, शिवप्रसाद शिंदे, मधुकर कदम, मधुकर शिंदे, जगन्नाथ ढोक, भागवत गरगडे, जालींदर ढोक, राजेंद्र शिखरे, सहदेव जंगाले, ज्ञानदेव जंगाले, तुराब शेख, नवनाथ पवार, सतीश भिसे, युवराज ढोक, सुग्रीव पाटील, संजय ढोक, किरण ढोक, नवनाथ कसबे, सुमीत कसबे, गोविंद ढोक, गणेश ढोक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पान १ वरून

### शेतकऱ्यांच्या...

अन्नदाता शेतक–यांना होणार आहे. यामुळे एकीकडे त्यांचे उत्पन्न वाढेल, तसेच ग्रामीण क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधीही वाढतील.

### सत्ताधाऱ्यांना...

अब्रू वाचविण्याची गरज आहे. बहिणींचा सन्मान राखला जावा, त्याकडे सरकारचे लक्ष नाही, असा जोरदार टोला लाडकी बहीण योजनेवरून महायुती सरकारवर शरद पवार यांनी लगावला.

### अरविंद...

जनतेच्या न्यायालयात आलो आहे. तुम्ही मला गुन्हेगार मानता की इमानदार? आता मी दोन दिवसांत मुख्यमंत्रिऐपदाचा राजीनामा देत आहे. मी घराघरांत आणि गल्ली–बोळात जाईन, जोपर्यंत जनतेचा निकाल येत नाही तोपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही.

### विरोधकांकडून...

नागपुरातील एका कार्यक्रमात नितीन गडकरी म्हणाले, मला एक घटना आठवते मी कोणाचेही नाव घेणार नाही. पंतप्रधान होणे हे माझ्या आयुष्याचे ध्येय नाही. मी माझ्या श्रद्धा आणि माझ्या संस्थेशी एकनिष्ठ आहे आणि मी कोणत्याही पदासाठी तडजोड करणार नाही, कारण माझा दृढनिश्चय माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाचा आहे.

### ६ तासांच्या...

खाद्यपदार्थ पुरवले आणि प्रत्येक गरजेमध्ये मदत केली. प्रवाशांसाठी हॉटेल्सही बुक केली जात आहेत.

### अकरावी...

विभाग रिक्त जागा ६ हजार ३१९ एकूण रिक्त जागा २ लाख २० हजार ६९२

पुण्यात ४३ हजार जागा प्रवेशासाठी रिक्तच

पुण्यात यंदा अकरावी प्रवेशासाठी ३४३ महाविद्यालयांमध्ये १ लाख २० हजार ८०५ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी १ लाख ३ हजार ५९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. म्हणजेच, उपलब्ध जागांपैकी १७ हजार २०५ विद्यार्थ्यांनी अर्जच केले नसल्याचे दिसून येत आहे. तर, नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यपैकि ७७ हजार ६०९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, अद्यापही प्रवेशासाठी ४३ हजार १९६ जागा रिक्तच राहिल्या आहेत.

### खाद्यतेलाच्या....

आयात शुल्क २० टक्के वाढविण्यात आले आहे तर, रिफाइंड सनफ्लॉवर सीड ऑइल, रिफाइंड पाम ऑइल, रिफाइंड सोयाबीन तेलांवर बेसिक ड्युटीचे दर ३२.५ टक्के करण्यात आले आहेत. त्यामुळे खाद्य तेलाचे दर भडकणार आहेत.

कस्टम ड्युटीत वाढ,
तेलाचे दर वाढणार

कस्टम ड्युटी वाढविल्याने सर्व खाद्य तेलांवरील प्रभावी शुल्क ३५.७५ टक्क्यांवर जाणार आहे. क्रूड पाम ऑइल, क्रूड सोयाबीन तेल आणि क्रूड सनफ्लॉवर सीड ऑइलवरील प्रभावी शुल्क ५.५ टक्क्यांनी वाढला असून, आता तो २७.५ टक्के होणार आहे. रिफाइंड सनफ्लॉवर सीड ऑइल, रिफाइंड पाम ऑइल आणि रिफाइंड सोयाबीन तेलावरचे शुल्क १३.७५ टक्क्यांवरुन ३५.७५ टक्के होणार आहे. त्यामुळे खाद्यतेलाचे दर भडकणार आहेत.

### रशियाला...

पाश्चात्त्य देशांच्या आरोपाचा इराणने निषेध केला आहे. परराष्ट्रमंत्री अर्घाची यांनी सांगितले की, इराणने रशियाला बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे दिली नाहीत. अमेरिका आणि त्याचे मित्र राष्ट्र चुकीच्या गुप्तचर माहितीवर काम करत आहेत. तर परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते नासेर कनानी यांनी ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीने लादलेल्या निर्बंधांना इराणमधील लोकांवर आर्थिक दहशतवाद असे वर्णन केले. तीनही युरोपीय देशांना योग्य कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

### आ. अमित...

राज्य पातळीवर स्वतः आणि देश पातळीवर आपले नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्याकडून आवश्यक ते सहकार्य नक्की मिळेल असे म्हणत उद्योग मित्र समूहाला शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, खासदार म्हणून सभागृहात गेलो आणि तेव्हापासून लातूरच्या रेल्वे बोगी कारखाना कधी सुरू होणार याकडे लक्ष घालून केंद्रीय रेल्वे मंत्र्यासोबत सातत्याने चर्चा केली असून लातूरचा हा प्रकल्प सर्वात चांगला असेल असे आश्वासन त्यांनी दिले असल्याचे सांगत या रेल्वे बोगी कारखान्यात स्थानिक तरुणांना प्राधान्य दिले जावे असा आग्रह धरला असून याबाबत त्यांनी सकारात्मकता दाखवली असून एमआयडीसी मधील उद्योजकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत कार्यरत राहीन असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थिताना दिला. दरम्यान वेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर उद्योग समूह यांच्याकडून उभारण्यात आलेल्या इमारतीची तसेच इमारतीमधील कॉन्फरन्स हॉल, कार्यालय, अतिथी विश्रामकरिता असलेले कक्ष याची पाहणी केली.

यावेळी बोलताना लातूर उद्योग समूहाचे अध्यक्ष चंदूलाल बलदवा यांनी लातूर उद्योग समूहाच्या स्वतंत्र इमारत उभारणी च्या कल्पने पासून ते इमारत उभारणी होईपर्यंत च्या सर्व कार्यात आलेले अनुभव, शासकीय मदत, उद्योजकांना मिळणारे सहकार्य यासह अन्य बाबीबाबत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या कडून वेळोवेळी मिळालेले सहकार्य आणि पाठबळ या सर्व गोष्टींना उजाळा दिला.

यावेळी खासदार डॉ.शिवाजी काळगे, चंदूलाल बलदवा, चंदू कचोडिया, बंटी कलिया, अभय निलेगावकर, रतन बिदादा हुकूमचंद कलंत्री, सुनील लोहिया, बी.एस.पवार, रतन बिदादा, विजय देशमुख, ॲड. किरण जाधव, सुरज स्वामी यांच्यासह उद्योग समुह परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

### मांजरा साखर...

माध्यमातून ऊस उत्पादक शेतक–यांना सर्वाधिक भाव दिला आहे.तीच परंपरा आजही कायम सुरु आहे.मांजरा कारखान्याने नेहमीच नवनवीन प्रयोग केले आहेत. त्याचा फायदा शेक–यांनाच मिळाला आहे.यांत्रिकीकरण हा सुद्धा नवीन प्रयोग आहे. हार्वेस्टींगचा प्रयोग केला त्याला चांगले यश मिळाले. आता कारखान्याची क्षमता वाढविण्यात आली आहे. त्याचाही फायदा शेतक–यांना होणार आहे, असे नमुद करुन त्यांनी कारखान्याच्या कर्मचा–यांना १६.६५ टक्के बोनस जाहीर केला.

सत्ताधारी लोकांमुळे राज्य पिछाडीवर माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सत्ताधाऱ्यांवर टीका विद्यमान सत्ताधा–यांनी महाराष्ट्राचे काय वाटोळे करुन ठेवले हे मी सांगण्याची गरज नाही, असे नमुद करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख म्हणाले, या सत्ताधा–यांमुळे महाराष्ट्र आज प्रत्येक क्षेत्रात मागे पडत चालला आहे. महाराष्ट्राला गत वैभव मिळवून देण्यासाठी आगामी विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीच्या प्रत्येक उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचंड मतांनी विजय करावे, असे आवाहन केले.

यावेळी अधिसभेपुढे कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई यांनी विषयांचे वाचन केले. कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल उटगे यांनी सुचक म्हणून तर संचालक अशोक काळे यांनी अनुमोदन दिले.टाळ्यांच्या गजरात सर्व विषयांना मंजूरी देण्यात आली. प्रारंभी विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. आदी उपस्थित होते. सर्वांचे स्वागत कारखान्याचे संचालक तात्यासाहेब देशमुख, वसंतराव उफाडे, अशोकराव काळे, व्यंकटराव कदम, सदाशिव कदम, अनिल दरकसे, सुर्यकांत पाटील, सचिन शिंदे, निलकंठ बचाटे, धनराज दाताळ, ज्ञानेश्वर पवार, कैलास पाटील, नवनाथ काळे, शेरखॉ पठाण, शंकरराव बोळंगे, निर्मला चामले, मंगलाबाई पाटील, बाबूराव जाधव, महेंद्रनाथ भादेकर, ज्ञानेश्वर भिसे यांनी केले.सुत्रसंचालन प्रा.सचिन सूर्यवंशी यांनी केले तर कैलास पाटील यांनी आभार मानले.

महाराष्ट्राचा स्वाभीमान पुन्हा मिळवू माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचा विश्वास भाजपा, शिवसेना(एकनाथ शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) या महायुतीच्या सरकारचे सुत्र गुजरातमधून हलत आहेत. महायुतीने महाराष्ट्राचा स्वाभीमान गहाण ठेवला आहे. बेकारी वाढली आहे. तरुणांची लग्न होत नाहीत. तरुण निराश आहेत. शेतक–यांचे प्रश्न गंभीर होत चालले आहेत.आरोग्याचे प्रश्न भेडसावत आहेत. आरोग्य रस्ते, वीज, पाणी या मुलभूत सुविधाही उपलब्ध होताना दिसत नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडी तमाम मतदारांच्या प्रचंड पाठींब्याच्या जोरावर भाजपा महायुतीला गाडून महाराष्ट्राचा स्वाभीमान पुन्हा मिळवेल, असा विश्वास माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना ही संस्था देशाचे नेते विलासराव देशमुख यांनी ४० वर्षांपुर्वी स्थापन केली.चार दशकांपासून आपण दरवर्षी एकत्र येतो.४० वर्षांत कसलीही कुरबूर नाही, असे उदाहरण कोठेच नाही.हे केवळ पारदर्शक कारभार आणि एकमेकांविषयीच्या विश्वासाच्या नात्याने शक्य होते.या उलट ग्रामसभेमध्ये काय होते याची कल्पना सर्वांना आहे, असे नमुद करुन माजी मंत्री आमदार अमित देशमुख पुढे म्हणाले, विलासराव देशमुख साहेबांनी समाजाचे हित जोपासले. सारं लातूर माझं कुटूंब, या विचारातून त्यांनी लातूर सुरक्षीत कसे राहिल, प्रगती कसे करेल याचे यशस्वी प्रयत्न केले. तोच विचार जोपासण्याचे काम माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केले आहे,

दिलीपराव देशमुख आपल्या सर्वांची काळजी घेणारे नेतृत्व मांजरा परिवाराने पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भापेक्षाही सर्वाधिक भाव दिला आहे. अनेकांनी साखर कारखाने काढले त्यांना हे जमले नाही.आता काहीजण गुळाचे कारखाने काढत आहेत. खरे तर मांजरा परिवार आमदार, खासदार निर्माण करणारा परिवार आहे. विलासरावजी देशमुख, दिलीपरावजी देशमुख, जयवंतरावजी आवाळे, अमित देशमुख, वैजनाथराव शिंदे, त्र्यंबक भिसे, धिरज देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना मांजरा परिवारानेच घडवले आहे. त्यामुळे आगामी काळातही मांजरा परिवाराचे आशिर्वाद कायम राहतील. कारण मांजरा परिवरातील प्रत्येक सदस्य हा मांजरा परिवाराचा ब्रॅण्ड ॲबेसेडर आहे, असेहीआमदार अमित देशमुख म्हणाले.

मांजराकाठ चा नाद करायचा नाय आमदार धीरज देशमुख यांचा विरोधकांना इशारा मांजराकाठचा नाद करायचा नाय, अशी गर्जना करीत लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यावेळी बोलताना म्हणाले, विलासराव देशमुखसाहेबांनी जयवंतराव आवळे यांना कोल्हापूरहून लातूरला आणून लातूरचे खासदार केले. त्या निवडणूकीत लोहा, कंधारच्या ईव्हीएम मशिनींपासून मतमोजणीस सुरुवात झाली. तेव्हा आवळे मायनस चालले होते. त्यावेळी विलासराव देशमुखसाहेबांनी म्हणले होते, थांबा माझा मांजराकाठ सुरु होऊ द्या. मांजराकाठची मतमोजणी सुरु झाली. आवळे खासदार झाले. त्याचीच पुनरावृत्ती २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत झाली आणि मांजराकाठ येऊपर्यंत लोहा, कंधारनेच डॉ.शिवाजी काळगे यांना लीड दिली. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या नेतृत्वाने हे घडवले.म्हणतात ना बापसे बेटा सवाई.त्यामुळे मांजराकाठचा नाद करायचा नाय, असे म्हणातच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

मांजरा परिवार विकासाच्या स्पर्धेत कधीही एकपाऊल पुढेच असणार, असे नमुद करुन आमदार धिरज देशमुख म्हणाले, गेल्या ४० वर्षांत विलासराव देशमुख मांजरा साखर परिवाराने शेतकजयांच्या हिताचे काम केले आहे.पुढेही ते अविरतपणे सुरुच राहणार आहे. ज्या देशाने जगाला साखर उद्योग दाखवला.ते देश आज मांजरा परिवारात येत आहेत. विलासराव देशमुखसाहेबांनी जगाला दिशा दाखवणारी साखर कारखानदारी आणली.ती दिलीपराव देशमुखसाहेब व अमित देशमुखसाहेब पुढे नेत आहेत. सत्ताा–यांनी चिंचोलीराव परिसरात रेल्वे बोगी कारखाना आणला. एक नाही तीन वेळा कारखान्याचे उद्घाटन केले. परंतू, बोगी काही बाहेर पडली नाही.उलट परदेशी कंपनीला कारखाना दिला. बेरोजगारांना रोजगार नाही, शेतक–यांच्या शेतमालाला भाव नाही, महिला भगिनींना सुरक्षा नाही.त्यामुळे बाप्पा तुम्ही जाताय़.महायुतीचे विघ्न घेऊन जा. अशी विनंतीही आमदार धिरज देशमुख यांनी श्री गणरायांना केली. गेल्या पाच वर्षांत नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे काम केले.मी स्वत: मतदारसंघात भरघोष कामे केली आहेत.इतरांच्या कामाचे श्रेय घेण्याचे काही कारण नाही. मतदारांनी मला पुन्हा संधी द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# पाच दिवसीय धम्म संस्कार प्रशिक्षण शिबिरास सुरुवात

लातूर / प्रतिनिधी– भगवान बुद्धाने मानवतेची सदाचरणाची शिकवण संपूर्ण जगाला दिली.सर्वच बौद्ध राष्ट्रांनी बौद्ध संस्कृती पारंपारिक पणे आपल्या देशात हजारो वर्षांपासून रुजवली आहे. धम्माचे गांभीर्य महत्व वृद्धी आणि जतन व जोपासना प्रांजळ व स्वाभिमानाने जागतिक बौद्ध करताना दिसून येतात.प्रत्येक बौद्ध देशांची बुद्ध वंदना पूजापाठ वेशभूषा उपोसथ कम्म ध्यान विपश्यना धम्म अभ्यास आणि ज्ञान यामध्ये एक वाक्यता व साम्यता आहे.

बुद्धाचा विचार हा भारतात आणि जगात प्रसारित झाला आहे.बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या आधुनिक काळात महामानव बुद्धांचा विचार राजा सम्राट अशोकाचे अनुकरण करीत लयास गेलेल्या बौद्ध संस्कृतीचे बीजारोपण सन १९५६ साली नागपूरला केले. तेव्हा समाजात धम्माबद्दल अभ्यास ध्यान विपश्यना वंदना पूजापाठ सूत्रपटन, धम्माचरण या सर्वांमध्ये मोठा फरक दिसून येतो. धम्म जागृती व त्याद्वारे प्रत्यक्ष धम्माचा प्रसार, खरे आचरणशील बौद्ध बनविण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न लातूर शहरात संस्कार शिबिर आयोजित करूण पु.भिक्खु पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शना खाली दि. १४ सप्टेंबर पासून ते १८ सप्टेंबर २०२४ पर्यंत पाच दिवसांकरिता धम्म प्रशिक्षण दिले जाणार आहे. दररोज सकाळी आठ ते सायंकाळी साढे सहा वाजेपर्यंत धम्मप्रशिक्षण आणि भिक्खू – भिक्खुणी आणि बौद्ध विद्वानांद्वारे सतत वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

शिबिराच्या सुरुवातीस महामानवांच्या प्रतिमेचे पुष्पाने धूपाने तथा दीपाने पुजन करण्यात आले. त्रिरत्न वंदने नंतर शिबिराचि सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी केशव कांबळे, उदय सोनवणे असितकुमार कांबळे, अनिरुद्ध बनसोडे, करण ओहळ, सचिन सुरवसे, मिलिंद धावारे, भरत कांबळे आदींनी प्रयत्न केले.

# जगुन घ्या !

क्षणभंगुर जीवनामध्ये आपण किती दिवस आहोत आणि कधी विकेट जाईल , याची कुणालाच खात्री नाही. आयुष्य जातं रुसण्या फुगण्यात, अबोला धरण्यात. बऱ्याच वेळा आधी कुणी बोलावं यातच अनेक वर्ष निघून जातात. जीवन हे क्षणभंगुर आहे. आज आहे तर उद्या नाही. शेवटी फक्त फोटोरुपी आठवणीच राहतात. म्हणून जगून घ्या. मनमुराद हसा, प्रेमाच्या लोकांशी गप्पा मारा. आपल्या धकाधकीच्या जीवनात त्यांच्यासाठी वेळ द्या. अगदी रडाव वाटलं तर रडून घ्या. प्रत्येक क्षण जगता आलं पाहिजे. वय ,नोकरी ,सत्ता, संपत्ती, व्यवसाय ,प्रतिष्ठा, जात, धर्म याच्या पलीकडे जाऊन जगता आलं पाहिजे. लहानपणी वाटतं मोठं व्हावं . मोठेपणी वाटत श्रीमंत व्हावं, आणि म्हातारपणी वाटतं पुन्हा लहान व्हावं. या सगळ्या चक्रव्युहात जगायचे मात्र राहूनच जातं. तुम्हाला जे आवडतं त्यासाठी वेळ द्या. कितीही कमावलं तरी आपण सोबत काही घेऊन जाणार नाही. आणि कितीही कमावलं तरी ते पुढच्या पिढीला टिकवताही आलं पाहिजे. याबाबत देखील विचार करायला हवा. आतापर्यंत तुम्ही इतरांसाठी मन मारून जगलाही असाल. पण तुमच्या मनाचं काय ?. पैसे नक्कीच कमवा कारण जगण्यासाठी ते लागतातच, पण थोडं स्वतःसाठी जगायला शिका. स्वतःचे छंद, स्वतःची आवड, स्वतःच्या इच्छा मारुन जगाल तर सर्व काही कमावून देखील तुम्ही शेवटी कफल्लकच राहीलात असे समजा. म्हणून मित्रांनो अजूनही वेळ गेली नाही, आनंदाने जगून घ्या. !!.

**– विनायक देशमुख,अहिल्यानगर**

# गणपती बाप्पा मोरया;पुढच्या वर्षी लवकर या..हंडरगुळीत विसर्जन





**हंडरगुळी (प्रतिनिधी)** गणपती बाप्पा मोरया,पुढच्या वर्षी लवकर या..! चालला रे चालला गणपती बाप्पा चालला,बघा रे बघा गणपती बघा.!! अशा घोषणा देत हंडरगुळी (ता.उदगीर) येथील सर्व गणरायाला जडअंत:करणाने निरोप देण्यात आला.यावेळी सजविलेल्या ट्रॅक्टर मधून सर्वच मंडळांनी श्रीच्या मूर्तीची भव्यदिव्य अशा मिरवणुका काढण्यात आल्या होत्या.यामुळे हळी व परिसरातील हजारो गणेश भक्तांनी विसर्जन मिरवणुक पाहण्यासाठी मेन राज्यमार्गालगत व गावातील प्रमुख रोडलगत तसेच टेरेसवर,बाल्कनीत मोठी गर्दी केली होती.गावातील सर्व मंडळाचे ट्रॅक्टर एकामागोमाग शिवाजी ज्यू.कॉलेज पासुन गणेश मुर्त्या घेऊन शिस्तीत निघाले.यामुळे हंडरगुळी सारख्या ग्रामीण भागात ही पुणे,मुंबई येथील मिरवणुकीसारखा अनुभव आला.त्यामुळे सर्व आनंदी व ऊत्साही वातावरण दिसत होते.

हंडरगुळी येथे ९ व्या दिवशी गणेशाचे विसर्जन करण्याची जुनी परंपरा आहे दि.१४ रोजी सकाळ पासुनच गावात गणेशाला निरोप देण्यासाठी सगळ्या मंडळामध्ये लगबग सुरु होती.यामुळे लहाणांपासुन ते मोठ्यांपर्यंत हजारो गणेश भक्त भगवे वस्त्र,टोपी,रुमाल घालुन बाप्पांच्या निरोपाची ऊत्साहा मध्ये तयारी करत होते.यामुळे सबंध गावात भगवे वादळआले होते.

रविवारी हंडरगुळीतील सर्व गणेशा ची आरती झाल्यानंतर विसर्जन मिरवणुकीस सुरुवात झाली.यावेळी राज्यमार्गालगतच्या शिवाजी कॉलेज समोरुन सगळ्या मंडळांचे सजवलेले ट्रॅक्टर्स बाप्पांना घेऊन एकामागोमाग निघाले.यावेळी अनेकांच्या हाता मध्ये भगवे ध्वज,भगव्यासह वेगवेगळ्या रंगाचे पेहराव केलेले व भगवी टोपी , भगवे रुमाल घातलेले हजारो लोकांमुळे हंडरगुळीत भगवे वादळ आल्या सारखे व हंडरगुळी ऐवजी पुणे,मुंबई येथील मिरवणुक बघत आहोत की काय ! असे मनमोहक व आकर्षक वातावरण हंडरगुळीत दिसत होते .

छ.शिवाजी महाराज चौकात सर्वच मंडळाच्या पदाधिकायांचा सत्कार व स्वागत सरपंच विजय अंबेकर,उप सरपंच बालाजी भोसले, ग्राम. वि.अ. एस.आर. कांबळे व सदस्यांनी केले .पोलीस विभागातर्फे सपोनी.बी. एस. गायकवाड, पोउपनी. एम.के. गायकवाड, संजय दळवे, टी.टी.बळदे, अक्केमोड, कसबे सोनकांबळे आदींनी चोख बंदोबस्त ठेवला

हंडरगुळीतील बाप्पांच्या विसर्जना प्रसंगी अनुचित घटना घडू नये,म्हणुन पोलिस विभागातर्फे चोख बंदोबस्त ठेवला होता.

# बिर्ला ओपन माईड्स इंटरनॅशनल स्कूल श्री गणेश विसर्जन



**उदगीर (प्रतिनिधी)** गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित बिर्ला ओपन माईड्स इंटरनॅशनल स्कूल उदगीर शाळेमध्ये गणेश चतुर्थी निमित्त दि. ०७ सप्टें. २०२४ रोजी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब राठोड यांच्या हस्ते गणपतीची विधिवत स्थापना करण्यात आली होती. यानिमित्त शाळेमध्ये सात दिवस बाप्पाची उत्साहात रोज विधीवत पूजा करून विद्यार्थ्यांना पौष्टिक प्रसादाचे वाटप करण्यात आले. शाळेतील श्री गणेश उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पर्यावरणाला अनुकूल व नुकसान न पोहोचता हा गणेशोत्सव साजरा करण्यात आला तसेच पर्यावरणाच्या संवर्धना बाबत जनजागृती करण्यात आली.

संस्थेचे सचिव अमित राठोड यांच्या संकल्पनेतून पर्यावणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच नदी-नाले , विहिरी व तलावात होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरिता बिर्ला ओपन माईडस इंटरनॅशनल स्कूल शाळेमध्ये शांततेत, फफुलांची उधळण करीत गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात ईको फफ्रेंडली पद्धतीने अत्यंत भक्ती भावाने प्रसन्न वातावरणात श्री गणेशाचे विसर्जन करण्यात आले.

विसर्जन मिरवणुकीत साऊंड किंवा डीजे न वापरता शिक्षक तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या झाँज पथक व पारंपरिक ढोल वाद्याच्या गजरात उपस्थितानी चांगलाच ठेका धरला त्यामुळे विसर्जन मिरवणुकीत चांगलाच रंग भरला होता. शाळेच्या परिसरात गणपती विसर्जनासाठी कृत्रिम हौद बांधण्यात आले होते व त्या हौदातच श्री. गणेशाचे विसर्जन करण्यात आले त्यामुळे नदी-नाले, विहिरी व तलावात होणारे प्रदूषण टाळण्यात आले.

याप्रसंगी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ.ज्योती राठोड, सचिव अमित राठोड, शाळेचे प्राचार्य ऋत्विक भट्टाचार्य, शालेय विभाग प्रमुख सचिन साळुंके उपस्थित होते. श्रीगणेश उत्सव व विसर्जन हे उत्साहात पार पाडण्यासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख स्वाती भांगे, सविता कोडगे, क्रीडा विभाग प्रमुख अर्शद खान तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.


## लातूर जिल्हा सह. दूध उत्पादक व पुरवठा संघ म. उदगीर

३८ वा वार्षिक अहवाल — सन २०२३ २०२४

**जा.क्र./ लादूसं/उदगीर / वार्षिक सभा/२०२४-२०२५/** **दि.१४.०९.२०२४**

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)

लातूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व पुरवठा संघ, म. उदगीर या संघाची ३८ वी वार्षिक सर्वसाधरण सभा दि.२९.०९.२०२४ रोजी दुपारी ठिक २-०० वाजता दुध शितकरण केंद्र, उदयगिरी औद्योगिक वसाहत लोणी उदगीर येथे संघाचे **अध्यक्ष प्रा. राजेंद्र नारायणराव सुर्यवंशी** यांचे अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजीत केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस आवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**-०: सभेपुढील विषय : ०-**

१) दिनांक २७.८.२०२३ रोजीचे वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) ३१.०३.२०२४अखेर संपणाऱ्या वार्षिक हिशोबी पत्रकास मंजूरी देणे.
३) सन. २०२३ - २०२४ चे संवैधानिक लेखा परिक्षण अहवाल वाचन करणे बाबत.
४) सन २०२४ - २०२५ सालासाठी तयार केलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देणे व सन २०२३- २०२४ च्या अंदाज पत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५) सन २०२४-२०२५ सालासाठी अंतर्गत लेखापरीक्षक, कायदेशीर सल्लागार आणि सेल्सटॅक्स-इनकमटॅक्स सल्लागाराची नेमनुक करणे व मेहनताना ठरविणे बाबतच्या संचालक मंडळाच्या शिफारसीस मान्यता देणे.
६) सन २०२३-२०२४ या वर्षासाठी शासन मान्य पॅनलवरील वैधानीक लेखा परिक्षकाची नेमणुक करणे.
७) महानंद कडून अनुदानावर मिळालेल्या मशनरीचे उभारणी करणे व फाऊंडेशन करणे बाबत.
८) विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांना दुध व दुग्धजन्य पदार्थ निर्मितीसाठी लागणारी आवश्यक ती मशनिरी खरेदीसाठी कर्ज उभारणीस परवानगी मिळणे बाबत.
९) नवीन मशिनरी खरेदीसाठी लातूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेकडे अथवा इतर वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थेकडे कर्ज मागणी प्रस्ताव तयार करणे बाबत.
१०) मुदत ठेव तोडणे बाबत.
११) मा. अध्यक्षाच्या पुर्व परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयाचा विचार करणे बाबत.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
**श्री आर.एस.बिरादार**
प्र. कार्यकारी संचालक
लातूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ म, उदगीर

**विषेश सुचना :-**
१) सभेच्या वेळी गणपूर्ती नसेल तर सभेचे कामकाज एक तास तहकुब करून ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) संलग्न सहकारी संस्था मार्फ़त हजर राहणाऱ्या प्रतिनिधीचे पंचकमटीचे ठरावाचा शिक्क्याच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात.
३) वार्षिक सर्वसाधारण सभेत विचारावयाचे प्रश्न दि. २१.०९.२०२४ पर्यंत संघाच्या कार्यालयास पाठवावेत. अन्यथा नंतर आलेल्या प्रश्नांना व सभेत तोंडी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देता येणार नाही.


# यादव गायकवाड यांना शिक्षकरत्न पुरस्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** नाशिक येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि जागतिक मानवता आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदे चे आयोजन लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय पंचवटी,नाशिक येथे करण्यात आले होते.

एक दिवसीय आंतर राष्ट्रीय परिषदेत म नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० समस्या,आव्हाने व संधी या विषयावर चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. या आंतर राष्ट्रीय परिषदेत शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या अतिशय महत्वाच्या योगदानाबद्दल जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पांगरा शिंदे ता.वसमत जिल्हा हिंगोली येथील प्राथमिक शिक्षक श्री यादव कामाजी गायकवाड यांना जागतिक मानवता आयोगाद्वारा देण्यात येणारा मशिक्षक रत्न २०२४ हा म राष्ट्रीय पुरस्कार प्रा.डॉ.सुधीर गव्हाणे माजी कुलगुरू य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक, इंजी.महेश डाबक सदस्य नीती आयोग भारत सरकार, जागतिक मानवता आयोगाचे सदस्य, संस्थेचे अध्यक्ष व प्राचार्य यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षक असणाऱ्या यादव गायकवाड यांनी सहा विषयात पदव्युत्तर पदवी केली आहे ,सेट नेट सारख्या नऊ परीक्षा उत्तीर्ण केल्यात आहेत, आनेक संशोधन पेपर प्रकाशित केले आहेत ,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात इतिहास विषयात सध्या हिव करत आहेत त्यामुळे यांना अतिशय मानाचा समजला जाणारा म जागतिक मानवता आयोगाद्वारा देण्यात येणारा शिक्षक रत्न २०२४ हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# मीनाक्षी स्वामी यांची राज्यसंवाद प्रभारीपदी निवड



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील योग शिक्षिका मीनाक्षी स्वामी यांची पतंजली योग समितीकडून महाराष्ट्र (पूर्व) राज्याच्या राज्यसंवाद प्रभारीपदी निवड झाली आहे.

पतंजली योगपीठ हरिद्वारचे केंद्रीय मुख्य प्रभारी डॉ. साध्वी देवप्रिया यांच्या नेतृत्वामध्ये वरिष्ठ राज्य प्रभारी सुधा अळळलीमोरे, राज्य प्रभारी महाराष्ट्र पूर्वचे संजीवनी माने, सहराज्य प्रभारी शोभा भागीया, राज्य आणि मंत्री मायाताई चव्हाण, सोशल मीडिया प्रभारी मीनल कहारे यांच्या मार्गदर्शनामध्ये ही नियुक्ती करण्यात आली आहे.

मीनाक्षी स्वामी यांच्या या निवडीबद्दल डॉ. माधुरी शास्त्री, महानंदा पाटील, स्मिता रेवणकर, कांचन ठाकरे, दीपा वानखेडे, कलावती भातांब्रे, सुमन पवार, कीर्ती स्वामी, प्रा.

वनिता पाटील, सीमा पवार, भाग्यलक्ष्मी मळभगे, सुमती भातांब्रे, छाया शेवाळे, ज्योती खानापुरे, महानंदा गजिले,

शीतल सरकाळे, पुष्पा ठाकूर, मधुमती शिंदे, सुमन चव्हाण, स्नेहलता मठवाले, संध्या बेद्रे, स्मिता पोद्दार आदींनी अभिनंदन केले आहे.


## उदगीर मनोरंजन

**कल्पना** 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय**

**भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स**

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशोरे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव





हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# यशवंत

सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४



# उदगीर

पान ४

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# संविधानाच्या बळावरच भारताची प्रगतीकडे वाटचाल -ना.संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** संविधान हा भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे .जगभरात भार-ताची प्रतिमा उंचावत आहे. महासत्तेकडे वाटचाल करणाऱ्या भारत देशाला संविधानाचा संपन्न वारसा आहे ,असे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनस-ोडे यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने उभारण्यात आलेल्या संविधान भवनाच्या उद्घाटन सोहळ्याच्या प्रसंगी येथील औद्योगिक शिक्षण संस्थेत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे जि.प.चे म ाजी अध्यक्ष राहुल केंद्रे,बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, सिद्धेश्वर पाटील, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर, गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, डॉ. एम .एस .कोनाळे, श्रीमती एस .आर.आचमे उपस्थित होते.

प्राचार्य सुनील जाधव यांनी प्रास्ताविक केले. संविधानाने आपल्याला समानतेचे सूत्र दिले आहे त्यामुळे सगळीकडे मिळणाऱ्या सुविधा उदगीरकरांना मिळाव्यात यासाठी मी कायम बांधील आहे असे ना. बनस-ोडे यांनी पुढे बोलताना सांगितले. उदगीर मतदार संघातील तरुणांना तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तरुणांनी भरारी घ्यावी यासाठी आगामी काळात प्रकल्प राबविण्याची ग्वाही बनसोडे यांनी यावेळी बोलताना दिली. मउदगीरला एम आयडीसी उभारण्यात येणार असून त्यातून तरुणांना रोजगार मिळेल असे नामदार बनस-ोडे यांनी पुढे बोल-ताना सांगितले.फ्साम ान्यातल्या सामान्य माणसाला त्याचा अधिकार मिळवून देण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे त्यामुळे आपण सर्वांनी संविधानाप्रती कृतज्ञ असणे गरजेचे आहे मअसे मत जि प चे माझी अध्यक्ष राह-ुल केंद्रे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले . मसंविधानाची उद्देशिका किमान अर्थासहित लक्षात ठेवणे हे भारतीय नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे मअसे मत कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले. पंडित सुकणीकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# आज उदगीर रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा

## जीवनगौरव व आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण





**उदगीर (प्रतिनिधी)** येथील रोटरी क्लब ऑफ्फ उदगीर सेंट्रल सन २०२४-२५ च्या पदाधिकाऱ्यांचापदग्रहण सोहळा आज सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी होणार आहे.

यावेळी एका सेवानिवृत्त शिक्षिकेचा जीवनगौरवने तर पाच आदर्श शिक्षिकांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उप-स्थित राहण्याचे आव-ाहन मावळत्या अध्यक्षा मंगला विश्वनाथे यांनी केले आहे. या पदग्रहण सोहळ्यासाठी व पुरस्कार वितरणासाठी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सन २६-२७ चे प्रांतपाल जयेश पटेल, डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सहा. प्रांतपाल पठाण नजीब माजिद खान हे उपस्थित राहणार आ-हेत.

रोटरी क्लब ऑफ्फ उदगीर सेंट्रल सन २०२४- २५ च्या अध्यक्षपदी सर-स्वती चौधरी यांची तर सचिवपदी ज्योती चौधरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तसेच याप्रसंगी संपूर्ण संचालक मंडळाचीही निवड करण्यात आली. रोटरीच्या नुतन संचालकांमध्ये विशाल जैन, रविंद्र हसरगुंडे, डॉ. सुलोचना येरोळकर, डॉ. सुधीर जाधव, प्रशांत मांगुळकर, विद्या पांढरे, अँड. विक्रम संकाये, चंद्रकांत मम दापुरे, प्रमोद शेटकार, नागेश आंबेगावे, कीर्ती कांबळे, डॉ. दत्तात्रय पाटील, विजयकुमार पारसेव-ार, किशोर पंदीलवार, सुयश बिरादार, संतोष फ्फुलारी, विशाल तोंडचीरकर, भागवत केंद्रे, शिवप्रसाद बोळेगावे, रामेश्वर निटूरे, डॉ. विजयकुमार केंद्रे, आशिष अंबरखाने, डॉ. मोहन वाघमारे, मल्लिकार्जुन चिल्लरगे, महानंदा सोनटक्के, व्यंकटराव कणसे, डॉ. सुनीता चवळे, बिपीन पाटील, सुनीता मदनूरे, अँड. मंगेश साबणे आदींचा समावेश असून या सर्व पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी ओमकार मंगल कार्यालय, डॅम रोड, उदगीर याठिकाणी साय. ४ वा. होणार आहे. सदर कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षिक तथा सामाजिक क्षेत्रा-तील उषा तोंडचीरकर यांचा जीवनगौरव त अनुराधा धोंड, प्रतिभ बिरादार, सुनीता भंडे, प्रभावती वडजे व वर्ष राठोड आदींचा राष्ट्राचे शिल्पकार पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाल उपस्थित राहण्याचे आ-वाहन रोटरी क्लबच्य वतीने करण्यात आले आहे.

**: तापमान:**


कमाल - ३०.५ से.

किमान - २३.८ से.

आर्दता - ७७.००

पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर

# कला माणसाला आनंद देते - मा. रवी राय, राजस्थान




**उदगीर (प्रतिनिधी)** प्रचंड गरिबी व प्रतिकूल परिस्थितीतूनही मी कलेच्या माध्यमातून रोजगाराबरोबरच आनंद मिळवतो. कारण कला ही नेहमी जीवनाला आनंद देत असते, असे मत राजस्थान येथील कलावंत मा. रवी राय यांनी व्यक्त केले.

श्री हावगीस्वामी महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्यावतीने टाकाऊ पासून टिकाऊ या विषयावर मार्गदर्शन व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले हो-ते. यावेळी कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.ए.ए.काळगापुरे तर मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.विठ्ठल गोरे उपस्थित होते.

आपण अनेक गोष्टी टाकून देत असतो.परंतु कल्पकतेने विचार केल्यास त्यापासून वस्तू बनविता येतात. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही याचा विचार आपण करायला हवा.असे प्रास्ताविकात डॉ. विठ्ठल गोरे यांनी सांगितले.

पुढे बोलताना मा.रवी राय म्हणाले, राजस्थ-ानमध्ये सतत दुष्काळ असतो. त्यामुळे आमचे लोक कलेच्या आधारे जीवन जगत असतात. मी शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त नसलो, तरी या कलेच्या माध्यमातून स्वाभिमानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो. असे सांगत विविध कागदापासून वेगवेगळ्या घरगुती व उत्सवासाठी वस्तू कशा बनवल्या जातात,याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना त्यांनी दाखविले.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ.ए.ए.काळगापुरे म्हणाले , विद्यार्थ्यांमध्ये अनेक सुप्त गुण असतात. त्या गुणांना वाव मि ळाला तसेच प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे.अशा कार्यक्रमातून आपणास प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास प्रा.डॉ. के.जी. कुंभारकर, डॉ. दयानंद धावणे, विद्यार्थी व विद्यार्थिनी उप-स्थित होते. कार्यक्रम ाच्या यशस्वीतेसाठी राम राठोड, राजू उप्परबावडे व धनराज हुसाळे आदींनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन डॉ.म.ई.तंगावार तर आभार डॉ.रोहिदास राठोड यांनी मानले.

# विश्वजीत गायकवाड फाऊंडेशन मार्फत तरुणाच्या आरोग्य आणि विचार संवर्धनाचा संकल्प

## ऐतिहासिक आणि स्पर्धात्मक परीक्षा मार्गदर्शक पुस्तकासह व्यायाम साहत्याचे वाटप



**उदगीर (प्रतिनिधी)** इंजिनियर विश्वजीत अनिल कुमार गायकवाड फाउंडेशन मार्फत तरुणाच्या आरोग्य आणि विचार संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे . याचाच भाग म्हणून ग्रामीण भागातील तरुणांसाठी वैचारिक साहित्याचा अभाव आणि व्यायामासाठी आवश्यक साधनांची कमतरता पाहून इंजिनियर विश्वजीत अनिल कुमार गायकवाड फ्फाउंडेशन मार्फत या ग्रामीण भागातील तरुणांसाठी पुस्तक आणि व्यायाम ाचे साहित्य वाटप करण्याचा शुभारंभ अवलकोंडा येथे करून करण्यात आला .

ग्रामीण भागातील तरुणांना ऐतिहासिक पुरुषांचे चरित्र माहित व्ह-ावे वैचारिक प्रगल्भता लाभावी यासाठी फाउंडेशन मार्फत धनंजय कीर लिखित डॉ बाबासाहेब आंबेडकर यासह फकीरा , क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर , महात्मा ज्योतिबा फुले ,श्रीम ान योगी ,लोकराजा शाहू छत्रपती ,राष्ट्रपती द्रोपदी मूर्मु राजर्षी शाहू महाराज यासह पोलीस भरती , ग्राम सेवक , तलाठी , बँक आदी स्पर्धा परीक्षेसाठी म ार्गदर्शक पुस्तक देण्यात येत आहेत .

तरुणांनी आपले ज्ञान वाढवावे आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आरोग्य चांगले राहावे यासाठी व्यायाम करावा . या ऐतिहासिक ग्रंथामुळे तरुणांना जीवन कसे जगले पाहिजे याबाबत ऐतिहासिक थोर पुरुषांचे चारित्र्य वाचून समजेल आणि व्यायाम साहित्य मदतीमुळे आरोग्य चांगले ठेवून स्पर्धा परीक्षेसाठी पूर्ण तयारी करता यावी यासाठी ग्रामीण भागातील तरुणांना ग्रंथ आणि व्यायाम साहित्य देण्यात येत असल्याचे इन्जि. विश्वजीत अनिलकुमार गायकवाड फाऊंडेशन चे अध्यक्ष विश्वजीत गायकवाड यांनी सांगितले .

यावेळी अवलकोंडा येथील तरुण आणि नागरिक उपस्थित होते

# संत ज्ञानेश्वर माउली विद्यालयात विद्यार्थ्यांना सात्विक पोषक आहार



**उदगीर (प्रतिनिधी)** विविध कडधान्यापासून बनवलेले सात्त्विक असे (मिलेट) रागी (रागी) ,उडीत दाळ यांच्यापासून पोषक इडली व सांबर विद्यार्थ्यांना देण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांची बौद्धिक वाढ होण्यासाठी त्यांना सकस ,पूरक* आहार शाळेच्या वतीने देण्यात येतो पण ,यामध्ये थोडीशी वाढ करून आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्याची गरज ओळख-ून गेल्या वर्षी मिलेट वर्ष म्हणून साजरे केले गेले , तसेच संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयाला या वर्षी २५ वर्ष म्हणजेच रौप्य महोत्सवी वर्ष साजरे होत आहे ,त्या अनुषंगाने विविध उपक्रमांनी तो साजरा होत आहे ,त्यात रागी पासून (मिलेट) ची इडली विद्यार्थ्यांना देण्यात आली ,

या वेळी शालेय संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव निटूरे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.जगताप अनिता ,संस्थेचे कोषाध्यक्ष अमोल निटूरे , शाळेतील सर्व शिक्षकृ वृंद व विद्यार्थी उपस्थित होते , या वेळी शाळेच्या परिसरातील अनेक पालक पण हा नवा उपक्रम पाहण्यासाठी उपस्थित होते. शाळा ही अनेक नवनवीन उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी उदगीर शहर व परिसरातील एक नामांकित शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. उपक्रम पाहण्यासाठी केंद्रप्रमुख शिक्षण विभागाच्या वती-ने श्री. बालाजी धमनसुरे यांनी भेट दिली. या सुंदर व स्तुत्य उपक्रम राबविण्यात आल्याबद्दल शाळेचे कौतुक केले.

## बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग